# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कामगार कल्याण विषयक दृष्टीकोन

**प्रा. सुरेश जोती पाटील** अर्थशास्त्र विभाग प्रमुख कला,वाणिज्य,विज्ञान महाविदयालय कोवाड, ता.चंदगड
मो.न.९७३८५०६२००

**प्रा डॉ.तेजस्विनी बी. मुडेकर** प्राचार्या,कमला कॉलेज कोल्हापूरमो.न. ९६०४३४३४००

---

**प्रस्तावना**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातील काही विध्दवानापैकी एक आहेत ते फक्त एक व्यक्ति नाहीत. तर एक विचाप्रवाह आहे.हजारो वर्षापासून दलित , उपेक्षित,वंचित व परिघाबाहेस असणाऱ्या समाजाची व्यथा मांडणारा महानायक. जाती आणि वर्णव्यवस्थेने गुलाम बनविलेल्या माणसांचा उध्दारदात्ता शतकानुशतके अज्ञान, दारिद्रय ,गुलामगिरी आणि शोषणाच्या चक्रात अडकलेल्या माणसांचा मुक्तीदाता. प्रखर बुध्दीमत्ता अभ्यासूवृती, ज्ञानाची प्रंचड लालसा असणार हा आधुनिक विज्ञानेश्वर होय.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार त्याशिवाय जे इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, धर्मशास्त्र, शिक्षणशास्त्र, भाषाशास्त्र, कायदाशास्त्र,कृषीशास्त्र, इ. ज्ञानशास्त्राचे निष्णांत पंडित तर होतेच. पण एक जगप्रसिध्द अर्थतज्ञ म्हणून ही ते विख्यात होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लिखाणातून, कार्यातून समाजपरिर्वतन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांचे विचार आजही राष्ट्राच्या प्रगतीसाठी दिशादर्शक ठरत आहेत.

कामगार नेता मजूरमंत्री आणि स्वतंत्र मजूर पक्षाचा संस्थापक या भूमिकामधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकरी, कामगार व मजूरांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कामगार /श्रमिक विषयक दृष्टीकोन विशद करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची उदिष्टे**

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा कामगार कल्याण विषयक दृष्टीकोन अभ्यासणे
२. कामगार नेता म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेणे.
३. मंजूरी मजूरमंत्री म्हणून डॉ..बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य अभ्यासणे .
४. स्वतंत्र मजूर पक्ष आणि डॉ..बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य अभ्यासणे.

संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार कल्याण विषयक विचारापुर्ती मर्यादित आहे.
संशोधन पध्दती-

प्रस्तुत शोधनिंबध वर्णनात्मक संशोधन पध्दतीवर आधारीत आहे. संशोधन पेपर दुयम माहितीवर आधरित असून दुय्यम माहिती संकलनासाठी, विशेषांक, संशोधन पेपर, चरित्र,वेबसाइट इत्यादीचा आधार घेतला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कामगार नेता मजूरमंत्री आणि स्वतंत्र मजूर पक्षाचा संस्थापक या विविध भूमिकामधुन शेतकरी कामगार व मजूरांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. डॉ. आंबेडकर इम्प्रुमेंट चाळीत रहात असताना त्यांना कामगांराचे जीवन जवळून पाहता आले. कामगारांच्या होणा-या शोषणाबाबत ते अधिक गंभीर झाले. वेगवेगळया उदयोगातील कामगार चळवळीचे नेतृत्व केले. कामागारांचे शोषण संपावे त्यांचे संघटन असावे या बाबत त्यी भूमिका अत्यंत महत्वाची होती. कामगारांनी राजकीय सत्ता हाती घेतली तर कामगार हिताचे कायदे करता येतील. असे त्याचे मत होते.

डॉ..बाबासाहेब आंबेडकरांनी शेतक-याचे हित साध्य करण्यासाठी मुंबई विधीमंडळात एक विधेयक मांडले. शेतजमिन कसणा-या कुळांची गुलामगिरी नष्ट करण्याच्या हेतूने अशा पध्दीतीचे विधेयक मांडणारे ते पहीलेच सदस्य होते.शेतीची खोती पध्दत नष्ठ होउन कुळाना जमिनीचे स्वामित्व मिळावे हा त्यांचा विधेयकामागचा मुख्य हेतू होता. परंतु राज्यकर्त्यानी हे विधेयक मंजूर होउ दिले नाही. त्यांनतर त्यानी महारवतन विधेयक सुध्दा मांउले पण ते ही शेवटपर्यत समंत झाले नाही.

डॉ..बाबासाहेब आंबेडकरांचा कम्युनिष्ठ कामगार चळवळीला विशेष विरोध होता.कारण कम्युनिष्ठ हे आपले राजकीय स्वार्थ साध्य करण्यासाठी कामगांराचा केवळ वापर करतात. त्यामुळे कामगांराचे हित साध्य होत नाही. असे डॉ..बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. त्यांनी कॉग्रेस पक्षाला सुध्दा समाजवादाच्या बुरख्याखाली भांडवलशाहीला खतपाणी घालणारा पक्ष ठरविला होता. कारण कॉग्रेस पक्ष वरवर समाजवादाचा गोष्टी करीत असला तरी या पक्षात धनिकांचा अधिक भरणा असल्यामुळे कामगार व श्रमिकांनी आपल्या कल्याणासाठी कॉग्रेस पक्षावर अवलंबून रहाणे बरोबर नाही. असे डॉ..बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९३६ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. कारण त्याना कामगार,शेतकरी व श्रमिकांना न्याय व हक्क मिळवून दयावयाचा होता.व एक सक्षम राजकीय पर्याय म्हणून हा पक्ष बळकट करायचा होता. या पक्षामध्ये शोषित, पीडीत कामगार, शेतकरी, शेतमजूर अस्पृश्य, दलित सर्व जाती धर्माच्या लोकांचा समावेश होता. या

पक्षाने १९३७ च्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये १७ जागापैकी १३ जागावर उमेदवार निवडून आणले. त्यामुळे अल्पावधीत उदयास आलेल्या या स्वंतत्र मजूर पक्षाने भारतीय राजकारणात आपला प्रभाव निर्माण केला. या पक्षाच्या माध्यमातून देशातील सर्व कामगार , शोषित,पीडती,शेतकरी ,शेतमजूर यांना किमान वेतन कामाचे तास, गिरण्या व कारखान्यातील कामगांराची नोकरीची शाश्वती, बढतीविषयी कायदेशीर तरतुदी करणे,भर पगारी रजा,कामगांराना पेन्शन, कामगारांचे आरोग्य, कामगारांच्या मुलांचे शिक्षण यासारख्या मागण्याचा पाठपुरावा केला आणि कामगार शेतकरी, श्रमिक, शाषित अशा सर्वानाच न्याय हक्क मिळवून दिले.

शेतक-यांचे प्रश्न सरकार समोर मांडण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मोर्चा काढला होता. त्यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ मुख्यमंत्र्याना भेटले त्यावेळी त्यांनी एक निवेदन मुख्यमंत्र्याना दिले. त्या निवेदनावर शेतावर काम करणाऱ्या मंजूराचे किमान वेतन ठरवणे. इनामदारी आणि खोती या पध्दती नष्ठ करण्याबाबत ताबडतोब कायदा करावा, सामाजिकदृष्टया जुलमी व आर्थिकदृष्टया कुचकामी ठरलेली जमिनदारी पध्दत संपुष्टात आणली पाहिजे. लहाण शेतकऱ्याना कालव्याच्या पाण्याचे दर कमी करावे इत्यादी मागण्याचा समावेश होता. त्यावेळी शेतकरी, कामगार, मजुराना उदेदशून भाषण करताना त्यांनी अहवान केले की, शेतकरी, कामगार ,मजूर यानी आपल्या हलाखिच्या कारणाचा शोध घेतला पाहिजे. ती आपली दैन्यवस्था दुर करण्यासाठी मजुरांची एक आधाडी निर्माण करावी.

रेल्वे कामगारांचे ही संघटन करण्याचे कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले आहे. १९३८ मध्ये मनमाड येथे रेल्वे कामगांराची परिषद भरली होती.त्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भाषण करताना रेल्वे रेल्वे कामगांराना उपदेश केला की, कामगारांनी स्पृश्यास्पृश्य असा भेदभाव करू नये कामगारांचा खरा शत्रू भांडवलशाही आहे. त्यामुळे कामगारांचे आप-आपसातील हवेदावे विसरून आपली एकजुट करावी.

१९३८ ला मुंबई विधीमंडळातत औधोगिक कलहाचे विधेयक चर्चेसाठी मांडले या विधेयकाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कडाडून विरोध केला. या विधेयकानुसार विशिष्ट परिस्थितीत संप करणे बेकायदेशीर ठरवले होते. हे विधेयक कामगांराचा संप करण्याच्या हक्काला बाधा आणणारे होते. मालकाच्या दृष्टीने हे विधेक पुरक होते. कामगाराविरूध्द पोलिस दलाचा उपयोग करण्याची मुबा या विधेयकात होती. असा निष्कर्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी काढला होता.

डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे असे मत होते की, संप करणे हा दिवाणी अपराध आहे. फौजदारी गुन्हा नव्हे. त्यामुळे या विधेयकाला बाबासाहेबानी नागरी स्वातंत्र्याच्या गळचेपीचा कायदा असे संबोधले व तो कायदा बेकायदेशीर ठरवला. परंतु त्यानी प्रचंड विरोध करूनही विधीमंडळाने ते विधेयक मंजूर केलेच. या दडपशाही कायदयाला विरोध करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूरपक्ष, कम्युनिष्ठ पक्ष गिरणी कामगार संघटनाच्या सहकार्याने संप पुकाराला. त्यानंतरच्या काळात एक प्रचंड ताकदीचा कामगार नेता म्हणून आंबेडकराची किर्ती पसरली होती.

<u>मजूर पक्ष म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे कार्य-</u>

२० जुलै १९८२ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मजूर मंत्रीपदाची सुत्रे हाती घेतली. मजूर मंत्रीपदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर १९४३ मध्ये नवी दिल्ली येथे संयुक्त कामगार परिषद घेतली. या परिषदेत युध्दसाहित्याचे काम करित असलेल्या कारखान्यात एक संयुक्त कामगार नियामक समिती नेमावी आणि सेवायोजना कार्यालयाची स्थापन करावी असे दोन मुददे् चर्चेसाठी होते. कागारांच्या हिताच्या दृष्टीने सेवायोजना कार्यालयाची आवश्यकता होती.त्या काळी अनुभवी व अर्धशिक्षित तंत्रज्ञ निरनिराळया योजनामधून तयार होत होते. त्याना भटकायला लागू नये, त्यांना नोकरी मिळवण्याचे मार्ग मोकळे असले पाहिजे. हा सेवायोजना कार्यालयाचा उददेश होता. त्याच बरोबर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे महत्वाचे कार्य म्हणजे स्त्री कामगारांना त्यानी न्याय मिळवून दिला. प्राचिन काळापासून स्त्री ला कमी लेखले जात होते. पुरूषापेक्षा कमजोर आहे. असा दुजाभाव केला जात होता. तिच्याकडून पुरूषाप्रमाणे काम करून घेतले जात होते. पण कमी लेखले जात होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कामगार कायदयात सुधारणा करून त्यांना कारखाना कायदयानुसार रात्री काम करण्याची बंदी घातली. स्त्रीयांच्या प्रसुतीवेळी त्यांना भरपगारी रजेचा फायदा मिळावा म्हणून विशेष प्रयत्न केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कोळसा खानित काम करणाऱ्या स्त्रीयांना प्रतिबंध केले होते. स्त्री कल्याणांच्या दृष्टीने बाबासाहेबांनी घेतलेली भूमिका योग्यच होती.

त्रिपक्ष कामगार परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनात बाबासाहेबांची अध्यक्ष म्हणून भाषण करताना अन्न,कापड,निवारा,शिक्षण सांस्कृतिक साधने , आरोग्याची साधने याविषयी कामगारांच्या मागण्या मांडल्या होत्या. कामगारांच्या हिताच्या दृष्टीने डॉ.आंबेडकारांनी आणखीन एक सुधारण केली होती. त्यानी मध्यवर्ती विधीमंडळात एक विधेयक समंत करून घेतले. त्या विधेयकात कारखान्यातील बारमाही कामगारांना भरपगारी रजा दयावी असे एक कलम होते.

मुंबईच्या टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्स या सस्थेच्या विदयार्थी संघापुढे भाषण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असे मत मांडले होते की, सक्तीची तडजोड आणि लवाद हे कामगांराना अत्यंत हितावह आहे. मी हे तत्व कामगारांच्या न्यायपध्दतीत कायमस्वरूपाचे करीन अशी मला अशा आहे.असे अश्वासन उपस्थित लोकांना दिले. याच

दरम्यान नवी दिल्ली येथे स्थायी समितीची बैठक पार पडली. त्यामध्ये डॉ.आंबेडकारांनी औधोगिक क्षेत्रातील कामगारांसाठी घरे बांधण्यासंबधीची मालकांची जबाबदारी आणि भरपगारी रजा या विषयावर चर्चा केली.

दिल्ली येथे भरलेल्या सातव्या हिंदी कामगार परिषदेमध्ये अध्यक्ष म्हणून भाषण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, कामगार धनिक वर्गाला एक महत्वाचा प्रश्न विचारू शकतात. तो म्हणजे जर युध्दाच्या खर्चासाठी मालकवर्ग कर देण्यास नकार देत नाही तर कामगारांच्या जीवनाचा दर्जा वाढविण्यासाठी जो निधी उभा करायचा आहे त्याला तुम्ही विरोध का करता जो खर्च युध्दावर झाला तो खर्च कामगारांच्या कल्याणासाठी झाला असता तर किती तरी लोकांचे कल्याण झाले असते.

औधोगिक शांतता प्रस्थापित होण्याच्या दृष्टीनेही डॉ.आंबेडकारांनी आपले विचार मांडले. सत्तेच्या बळावर औधोगिक शांतता प्रस्थापित करता येणे शक्य नाही. तर ती सामाजिक न्यायनितीच्या बळावर करता येणे शक्य आहे. कामगारांनी आपले काम करण्याचे कर्तव्य ओळखले पाहिजे. कामगारांनी कामचुकारपणाची वृत्ती टाकून दिली पाहिजे. मालकांनी कामगारांना काम करण्यास जी अनुकूल परिस्थिती निर्माण करणे. तसेच सरकार आणि समाज हयांनी औधोगिक सबंध सलोख्याचे रहावे यासाठी प्रयत्न केले पाहिजे.

अशा प्रकारचे विचार माडूंन व प्रत्यक्षात अमलांत आणून डॉ. आंबेडकरांनी मंजूरमंत्री म्हणून कामगारांचे कल्याण साधण्याचा वेळोवेळी प्रयत्न केला आहे.

**निष्कर्ष**-

वरील सर्व बाबासाहेबांच्या विचारांचा व कार्याचा अभ्यास केल्यानंतर आपल्या लक्षात येते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी कामगारांना भांडवलशाहीच्या गुलामगिरीतून मुक्त करून, त्यांना न्याय व हक्क मिळवून दिले. शोषित, कामगार, शेतकरी, मजूर व स्त्रीया यांच्या कल्याणासाठी आयुष्यभर संघर्ष केला. मजूर पक्षाची स्थापना करून या माध्यमातून अंदोलने व संप केले. कामगार वर्गाला संघटीत करून त्यांची हक्काची जाणीव केद्रींय मजूरमंत्री , कामगारमंत्री या पदावर कार्यरत असताना कामगार कल्याणासाठी कायदे केले. आजची कल्याणकारी निती शासन राबवत आहे. हि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या काळातच सांगितली होती. यावरून त्यांची दुरदृष्टी आणि सामान्याप्रती असलेला जिव्हाळा दिसून येतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आपल्या देशाला आजही मार्गदर्शक व दिशादर्शक ठरत आहेत. आणि या पुढच्याही काळात ठरतील.

**संदर्भ–**

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे- खंड -११
२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे- खंड -१८
३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे- खंड -२०
४. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र – किर धनंजय पाप्युलर प्रकाशन
५. अर्थसवांद - ऑक्टोंबर-डिसेंबर २०११
६. https// www.bms.org.in/ambedkars-thoughts-on-labour-and-labour-legislation.